महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २७९ वा दिनांक : ०६/०९/२०२५ वार : शनिवार

## फडणवीसांनी मराठा, ओबीसींना पद्धतशीरपणे खेळवले - विजय वडेट्टीवार



**सांगली :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मराठा व ओबीसी या दोन्ही समुदायांना पद्धतशीरपणे खेळवल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना केला. महायुतीचे सरकार बाभळीच्या झाडाला दगड मारते आणि त्यानंतर आंबे पडले म्हणून ओरड करते, असेही ते यावेळी म्हणालेत.

काँग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते डॉक्टर पतंगराव कदम यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या लोकतीर्थ स्मारकाच्या लोकार्पण सोहळ्याला आज १ वर्ष पूर्ण झाले. यानिमित्त आयोजित एका समारंभात बोलताना विजय वडेट्टीवार यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सरकारने काढलेल्या जीआरवर संशय व्यक्त केला. ते म्हणाले, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री फार चतूर व चाणाक्ष आहेत. त्यांनी दोन्ही समाजांना पद्धतशीरपणे खेळवण्याचे काम केले. त्यांनी जो जीआर काढला आहे, त्याचा काहीच अर्थ लागत नाही. ओबीसींना काय दिले हेच समजत नाही. एकाने मारल्यासारखे करायचे आणि दुसऱ्याने रडल्यासारखे करायचे अशा पद्धतीचे स्क्रिप्टेड काम सध्या राज्यात सुरू आहे. भविष्यात या प्रकरणी सर्वांच्या तोंडाला पाने पुसल्याचे दिसून येईल.

राज्य शासनाने काढलेल्या जीआरचा अर्थच कळत नाही. महायुतीचे हे सरकार बाभळीच्या झाडाला दगड मारते आणि आंबे पडले म्हणून ओरडते. पण प्रत्यक्षात जवळ गेले की, पायात काटे रुततात. जे-जे त्यांच्या जवळ गेले त्यांना ते कळेल, असे वडेट्टीवार म्हणाले. यावेळी त्यांनी ओबीसी समाजाच्या बारामती येथील मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारल्याच्या मुद्यावरूनही सरकारवर निशाणा साधला. मोर्चा काढणे, आंदोलने करणे, घोषणा देणे, उपोषण केल्याने या सरकारच्या बुडाला का आग लागते? त्यांना राग का येतो? ओबीसींचा आवाज दाबायचा आहे का? अशा विविध प्रश्नांची सरबत्ती त्यांनी या प्रकरणी केली.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी महिला आयपीएस अधिकाऱ्याला कथितपणे दमदाटी करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले, कुणी चोरीचे व चुकीचे काम केले असेल तर कारवाई करणे हे पोलिस अधिकाऱ्यांचे काम आहे. सत्ता सेवेसाठी आहे. दुसऱ्यांवर दादागिरी गाजवण्यासाठी नाही. महिला अधिकाऱ्यावर दादागिरी करणे हे लोकशाहीला शोभणारे नाही. त्यांची भूमिका मन वाटेल तसे काम करण्याची दिसते. आज सत्तेतील प्रत्येकाला माज आला आहे. पूर्वी सत्ता सेवेसाठी होती, पण आता महायुतीच्या सरकारला सत्ता मालकी हक्काने मिळाल्याचे वाटते.

## जरांगे नावाचे भूत शरद पवारांनी महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसवले - लक्ष्मण हाके



**बारामती :** राज्य सरकारने मराठा आरक्षणाच्या संदर्भातील मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य केल्यानंतर राज्यातील ओबीसी समाज नाराज झाला आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली आहे. तसेच आता लक्ष्मण हाके यांनी देखील याचा जोरदार निषेध व्यक्त करणे सुरू केले आहे. आज त्यांनी बारामती येथे ओबीसींचा मोर्चा काढत पवार कुटुंबावर जोरदार हल्लाबोल केला.

लक्ष्मण हाके यांनी मराठा आरक्षणाच्या संदर्भातील शासन निर्णयाची प्रत फाडत मौन आंदोलन केले होते. आज त्यांनी अजित पवारांचा बालेकिल्ला असलेल्या बारामती येथे ओबीसींचा मोर्चा काढत अजित पवार यांच्यासह शरद पवारांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शरद पवारांनीच मनोज जरांगे यांना उभे केले. त्यांनीच मनोज जरांगे नावाचे भूत महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसवले असल्याची टीका केली.

लक्ष्मण हाके म्हणाले, शरद पवार मत आमची घेतात आणि जरांगेंना पाठिंबा देतात. मंडल आयोग शरद पवार यांनी लागू केला असे जर कोणी म्हटले तर त्याचे कानफाड फोडा, असे हाके यांनी म्हटले. तसेच देशभरात मंडल आयोग लागू झाला होता, फक्त महाराष्ट्रातच लागू झाला नव्हता. मंडल आयोगाची चळवळ शेकापचे दि. बा. पाटील, बबनरावजी ढाकणे, शिवाजीभाऊ शेंडगे, गोपीनाथ मुंडे, छगन भुजबळ, अरुण कांबळे, बाळासाहेब आंबेडकर या सगळ्या माणसांनी मंडल आयोग लागू केल्याचे हाके म्हणाले.

दरम्यान, लक्ष्मण हाके यांचे भाषण सुरू असतानाच वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांचा फोन आला. आंबेडकरांनी फोनवरून उपस्थित जनतेशी संवाद साधला. आंबेडकर म्हणाले, जबरदस्ती दिलेले आरक्षण आहे, आपल्याला रस्त्यावर उतरावे लागेल, असे यावेळी बोलताना आंबेडकरांनी म्हटले. कुटुंबाच्या बाहेर कारखाने जाऊ न देणारे, कुटुंबाच्या बाहेर आमदारकी खासदारकी न जाऊ देणारे म्हणत लक्ष्मण हाके म्हणाले, शरद पवार ४०० संस्थांचे अध्यक्ष आहेत. रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष हा महाराष्ट्राचा मुख्यमंत्री राहील असा नियम होता. मात्र, त्यामध्ये खाडाखोड केली आणि शरद पवार अध्यक्ष झाले. वसंतदादा शुगर इंस्टिट्यूटचे अध्यक्ष शरद पवार झाले, असेही हाके यांनी म्हटले.

## राज्यातील ६ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मान

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज महाराष्ट्रातील ६ शिक्षकांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना राष्ट्रपतींनी शिक्षकांचे योगदानच भारताला सुपर पॉवर अर्थात महासत्ता बनवेल असे मत व्यक्त केले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी येथील विज्ञान भवनात आयोजित एका शानदार कार्यक्रात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मान केला. प्रमाणपत्र, रौप्य पदक व रोख ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. महाराष्ट्रातील ६ शिक्षकांनाही हा पुरस्कार मिळाला. त्यात नांदेडच्या अर्धापूर येथील जिल्हा परिषदेचे शिक्षक डॉ. शेख मोहम्मद वकिउद्दीन शेख हमीदोद्दीन, मुंबई स्थित एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २ च्या शिक्षिका सोनिया विकास कपूर, लातूरच्या दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स महाविद्यालयाचे शिक्षक डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे, मुंबई स्थित शाह अँड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डॉ. नीलाक्षी जैन, बारामतीच्या एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंगचे प्रा. पुरुषोत्तम पवार व संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूरच्या अनिल रामदास जिभकाटे यांचा समावेश आहे.

डॉ. शेख मोहम्मद वकिउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड) २८ वर्षांपासून विज्ञान शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. शेख यांनी ग्रामीण भागातील अल्पसंख्याक मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. 'सुरक्षित शिक्षण तुमच्या दारी' या उपक्रमातून त्यांनी गावापासून दूर भाड्याच्या जागेत शाळा सुरू करून मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. घरोघरी जाऊन पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि मुलींसाठी मोफत सॅनिटरी पॅड वाटप सुरू केले. बालभारतीच्या सहावी ते बारावीच्या पुस्तकांसाठी लेखन केले असून त्यांना यापूर्वी राज्य पुरस्कारही मिळाला आहे.

सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई) मुख्याध्यापिका सोनिया कपूर यांनी कमी खर्चातील शिक्षण साहित्याची निर्मिती करून सहकारी शिक्षकांना प्रशिक्षण दिले. 'टीच टू एनरिच' या पुस्तकाच्या लेखिका असलेल्या कपूर यांनी समूह आधारित शिक्षण आणि आयसीटीचा वापर शिक्षणात प्रोत्साहित केला. गेल्या २३ वर्षांत विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्ये आणि मूल्ये दृढ करण्यावर त्यांनी भर दिला.

डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर): संगीत विषयाचे प्राध्यापक असलेले डॉ. जगदाळे हे लातूरमधील पहिले राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते ठरले. तबलावादक आणि गायक म्हणून प्रसिद्ध असलेल्या त्यांनी गोंड आदिवासी वस्त्यांवर शिक्षण पोहोचवले. एचआयव्ही बाधित व अनाथ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले. अंध विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीतील संगीत पुस्तक तयार करणे हे त्यांचे विशेष योगदान आहे. कोविड काळात दूरदर्शन, रेडिओ आणि सोशल मीडियाद्वारे त्यांनी लोकगीते व पोवाड्यांच्या माध्यमातून जनजागृती केली. त्यांच्या लिखाणातील १३ संगीतग्रंथ परदेशातही प्रसिद्ध झाले आहेत.

डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई) अभियांत्रिकी शिक्षणातील नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आणि संशोधनासाठी डॉ. जैन यांचा सन्मान झाला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्ये यश मिळवले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक ज्ञानच दिले नाही तर सर्जनशीलता आणि संशोधनाची गोडी लावली.

प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाविषयी जागरूकता आणि कौशल्य विकास घडवून आणण्यासाठी प्रा. पवार यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी उद्योजकतेला प्रोत्साहन देत स्थानिक समुदायालाही शिक्षणाशी जोडले.

अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) नवीन पिढीला व्यावसायिक कौशल्य आणि शिक्षणाद्वारे सक्षम करण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय प्रयत्न केले. त्यांनी नागपूरच्या वर्किंग कार्यशाळांपासून आपली यात्रा सुरू केली, जिथे त्यांनी ७०० हून अधिक शिक्षण सत्रांचे आयोजन केले आणि १४ पेक्षा जास्त पात्रता (क्वालिफिकेशन्स) मध्ये सहभाग घेतला. त्यांच्या या योगदानामुळे शिक्षण आणि कौशल्य विकास क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रभाव पाडला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ सप्टेंबर २०२५


# दुचाकी घसरून झालेल्या अपघातात एक जण जखमी






**दौलताबाद (जावेद अहमद) :** छत्रपती संभाजीनगर खुलताबाद मार्गावर अब्दीमंडी गावाजवळ शुक्रवारी संध्याकाळी ४,३० वाजेच्या सुमारास दुचाकी घसरून झालेला अपघातात सलीम खान युनूस खान वय २८ राहणार शेणपुंजी,रांजणगाव ता.जी, छत्रपती संभाजी नगर हे जखमी झाले. सलीम हे होंडा पॅशन दुचाकी क्रमांक एम.एच २०,एफ,बी ०६९८ वरून रांजणगाव येथून खुलताबाद कडे जियारत साठी जात असताना अब्दिमंडी गावाजवळ कुत्रा गाडी समोर आल्याने दुचाकी घसरून झालेला अपघातात सलीम हे जखमी झाले शेख अमीर,अकबर खान यांनी खुलताबाद कडे जियारत साठी जाणाऱ्या भाविकांच्या मदतीने जखमीला जगद्गुरु नरेंद्राचार्य संस्थानच्या रुग्णवाहिकेत टाकून छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# शरीराला श्रमाकडे, बुध्दीला मनाकडे आणि हृदयाला भावनेकडे वळविणे म्हणजे शिक्षण - डॉ. अ. करीम सालार




**जळगाव ता. ०५ (प्रतिनिधी) :** डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.त्यात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावली. दिवसभर शाळेचे कामकाज शिस्तबद्ध पद्धतीने सांभाळत शिस्तीचेही दर्शन त्यांच्याकडून घडवण्यात आले. तसेच शिक्षकांप्रती विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. प्राचार्य शेख शकील यांच्या मार्गदर्शनाखाली दहावीचे वर्गशिक्षक इशतियाक अहमद,सांस्कृतिक विभाग प्रमुख आरीफ खान व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमांचे आयोजन केले होते. शेख हुझेफा हिने मुख्याध्यापक म्हणून शाळेचे कामकाज पाहिले तर शेख साद, अनस मणियार,अम्मार खान, मोइज, शाफे, निदा, सुमेरा आयेशा,शिफा या विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका निभावली. त्यानंतर शाळेत कार्यक्रम घेण्यात आला.शाळेचे प्राचार्य शेख शकील व शाळेचे उप प्राचार्य एम. ए. खान यांच्या हस्ते उत्कृष्ट विद्यार्थी शिक्षकांना फाईल फोल्डर, ड्रॉइंग किट व कंपास बॉक्स प्रदान करून सन्मानित करण्यात आले. शिक्षीका जिया उन्निसा, इशतियाक अहमद यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. सूत्रसंचालन दानिश इंतेखाब आलम यांनी केले. अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक शेख शकील यांनी केला

# गुंजोटी येथे ईद-ए-मिलादुन्नबी जुलूस उत्साहात : मुस्लिम बांधवांनी केला पैगंबरांच्या शिकवणींचा प्रचार



**गुंजोटी, ता.५ (प्रा. नागसेन कांबळे) :** पैगंबर हजरत मोहंम्मद सल्ललाहो अलैही व सल्लम यांच्या १५०० व्या जयंती अर्थात ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त गुंजोटी येथे पारंपारिक पद्धतीने मौलाना सज्जाद बरकाती यांच्या नेतृत्वाखाली जुलूस-ए-मोहंम्मदी शुक्रवारी(ता.५) काढण्यात आले. यानिमित्ताने गावातील सर्व मस्जिदवर विद्युत रोषणाई व सजावट करण्यात आली होती. गावातील मोहंम्मदिया मस्जिद येथे लहान मुले, तरुण आणि ज्येष्ठ नागरिक यांनी मोठ्या संख्येने एकत्र येत जुलूसला सुरवात करण्यात आली.'गुम्बद-ए-खिजरा'ची प्रतिकृती, घोड्यावर लहान मुले स्वार होत, हिरवे झेंडे, नात-ए-शरीफ पढण, पैगंबर यांच्या संदेशांचा बॅनर द्वारे प्रचार करत जुलूस मुख्य मार्गाने शांततेत मार्गस्थ होत हजरत हाजी सय्यद मुनव्वर रहेमतुल्लाह अलेह दर्गा येथे समारोप करण्यात आला. दरम्यान जागोजागी युवकांचा समूह एकत्र येत शरबत, मिठाईचे वाटप करत जुलूसचे स्वागत करण्यात आले. दर्गा येथे धर्मगुरूंनी पैगंबरावरील प्रेम आणि श्रद्धा व्यक्त करण्यासाठी ईद-ए-मिलादुन्नबी साजरी केली जाते असे मौलाना सज्जाद बरकाती, मौलाना गुलाम रसूल पठाण व मौलाना शरीफरजा यांनी स्पष्ट केले.शुक्रवारची प्रार्थना आणि सलातो सलाम पठणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी दर्गा फाउंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी गावचे उपसरपंच आयुब मुजावर, अशपाक मुजावर, लाल पटेल, मोहियोद्दीन काझी, मोहियोद्दीन मुजावर, मुखद्दस मुजावर, नदीम मुजावर, हारून मुजावर, अझर पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. जुलूसच्या यशस्वीतेसाठी जुलूस समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

# राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस तालुकाध्यक्ष पदी आप्पासाहेब गायके यांची निवड



**कन्नड (अरुण थोरात) :** राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्षाच्या कन्नड तालुकाध्यक्ष पदी खामगाव ता.कन्नड येथील आप्पासाहेब पुंडलिक गायके यांची निवड करण्यात आली आहे.राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्षाचे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष अनुराग पाटील शिंदे यांनी नियुक्ती पत्रा द्वारे ही नियुक्ती जाहीर केली आहे.या निवडीबद्दल राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष अनुराग शिंदे, निरिक्षक दिलीप बनकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष कैलास आबा अकोलकर, विनायक चव्हाण, संजय कवडे यांनी अभिनंदन केले आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ सप्टेंबर २०२५


## अब्दीमंडी येथे मिलादुन्नबी उत्साहात साजरी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** अब्दीमंडी येथे ईद-ए-मिलादुन्नबवी शुक्रवारी उत्साहात साजरी करण्यात आली. दौलताबाद व अब्दीमंडी येथील मजिद वर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती तसेच दौलताबाद बस स्टँड परिसरात ही विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ईद-ए-मिलादुन्नबीचा मुख्य कार्यक्रम जामा मस्जिद दौलताबाद येथे घेण्यात आला. सालाबाद प्रमाणे येथे दहा क्विंटल गोड भाताचा महाप्रसाद करून खुलताबाद येथे दर्शनासाठी जाणाऱ्या व येणाऱ्या भाविकांना वाटप करण्यात आला ही परंपरा गेल्या दीडशे वर्षापासून दौलताबाद येथे अखंड सुरू असल्याचे सांगण्यात येते हा गोड भाताचा प्रसाद दौलताबाद परिसरातील सर्व धर्मीय नागरिक मोठ्या उत्साहात घेतात. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी शेख एजाज, शेख नूर ,शेख अलाउद्दीन,जम्मू टेलर, शेख नइम, सय्यद शेरू,शेख रईस,शेख कयूम,रहमान कुरेशी, गोरू खान,सय्यद बाबर,शेख जुबेर,शेख जुनेद, आदिंबरोबर बरोबर समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

## रानडुकरांचा हैदोस अल्पभूधारक शेतकर्यांवर सुलतानी फेरा



**कन्नड (अरुण थोरात) :** कळंकी ता.कन्नड शिवारातील शेतांत रानडुक्कर, वानर आदी वन्यजीवांनी हैदोस घातला असून अल्पभूधारक शेतकर्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. कळंकी येथील अत्यल्पभुधारक शेतकरी कचरु रंभाजी थोरात यांची गावा लगत गट क्रमांक 183 मध्ये एक हेक्टर जमीन आहे. त्यात त्यांनी मका पिकाची लागवड केली होती. त्यापैकी कणसे भरण्याच्या अवस्थेत असलेली एक एकर मका रानडुकरांनी उध्वस्त केली आहे. त्यामुळे या शेतकर्यांवर समोर वर्षभरात संसारगाडा कसा चालवावा याचा यक्ष प्रश्न उभा राहिला आहे. सर्व प्रकारची उपाययोजना करुन ही रानडुक्करे दाद देत नसल्याने हाता तोंडाशी आलेला घास हिरवतांना बघावा लागत आहे. दरम्यान या नुकसानीचा पंचनामा वनविभागाने केला असला. तरी मिळणाऱ्या भरपाईत वर्षभरात कुटूंबाचा निर्वाह होईल की नाही. यात शंका आहे. तसेच येथील हरिश्चंद्र बालचंद थोरात, सचिन थोरात, नितीन नानासाहेब थोरात, नामदेव दाभाडे, भगवान कदम, योगेश थोरात, भाऊसाहेब कदम, गंगूबाई थोरात, गणेश कदम, दादा काटे, संतोष कदम, अरुण थोरात आदी शेतकर्यांच्या मका, भुईमूग पिकांचे हि मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे.यंदा पाऊस पाणी दमदार झाल्याने खरिप हंगामा कडून शेतकऱ्यांना मोठी आशा निर्माण झाली होती. पिक ऐन दाणे भरण्याच्या अवस्थेत आले असतांना वन्यजीव विषेशतः रानडुकरांनी शेतकऱ्यांच्या तोंड चे पाणी पळविले आहे.तुटपुंजी नुकसान भरपाई देण्या ऐवजी या उपद्रवी रानडुकरांचा बंदोबस्त करुण शेतकऱ्यांना सुखाने जगू देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.






## माधवराव पाटील महाविद्यालयात शिक्षक दिन व्याख्यानाने साजरा




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जन्म दिवस हा शिक्षक दिन शुक्रवारी (ता.५) रोजी व्याख्यानाने साजरा करण्यात आला. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. नरसिंग कदम यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् : व्यक्ति आणि विचार या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. अरुण बावा, प्रा. गोपाळ कुलकर्णी, डॉ. सुजित मटकरी, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. नागनाथ बनसोडे, डॉ. विलास खडके, डॉ. दिनकर बिराजदार, डॉ. संध्या डांगे, डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. सुभाष हुलपल्ले, लालाअहमद जेवळे, इसाली चाऊस, चंद्रकांत पुजारी, व्यंकट मंडले आदिंसह विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आप्पासाहेब सुर्यवंशी यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेश मोटे तर आभार डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ सप्टेंबर २०२५

## आदर्श महाविद्यालय उमरगा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिक्षक दिन




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : आदर्श महाविद्यालय उमरगा येथे पाच सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राम सोलंकर सर,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य माळगे सर, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. मेनकुदळे सर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. तात्याराव चव्हाण, डॉ.फुलचंद पवार प्रा.जोजन रवींद्र यांची प्रमुख उपस्थिती होती अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. राम सोलंकर यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला आणि शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनी केलेल्या त्यागामुळे आणि समर्पणामुळेच आज आपण आपल्या जीवनात यशस्वी होऊ शकतो असे ते म्हणाले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. धनंजय मेनकुदळे यांनी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश कसा निर्माण केला आहे हे त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले. कार्यक्रमाचे संचलन प्रा. तात्याराव चव्हाण यांनी केले व आभार प्रा. फुलचंद पवार यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमासाठी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवनियुक्त ठाणेदारांची वाळूमाफियांवर धडक कारवाई : लाखोंचा मुद्देमाल हस्तगत






**किनगांव राजा (महेश मुंढे)** सिंदखेडराजा तालुक्यातील किनगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार पदाचे सूत्रे हाती घेताच अवघ्या महिन्याभरात ठाणेदार श्री संजय मातोंडकर यांनी वाळू माफियान विरोधात मोठी कार्यवाही केली त्यामुळे अवैद्य धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मिळणाऱ्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर अवैध्य वाळू वाहतूक रोखण्यासाठी ठाणेदार संजय मातोंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले सविस्तर वृत्त असे की गुरुवारी मध्यरात्री हे पथक गस्तीवर असताना गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचत अवैध वाळू वाहतूक करणारे दोन टिप्पर व पोलिसांवर व महसूल विभागाच्या पथकावर पाळत ठेवून असलेले वाहने व आरोपी याना ठाणेदार संजय मातोंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली या पथकाने किनगाव राजा ते हिवरखेड पूर्णा या रोडवर अचानक धाड टाकत अटक केली. आदरणीय ठाणेदार पोलीस ठाणे किनगाव राजा तर्फे फिर्यादी पोहेका. विश्वास काकड पोलीस स्टेशन किनगाव राजा यांनी गुन्हा क्र. १,कलम ३०३ (२) बी एन एस २०२३ सह क. २१(१),२१(२) गौण खनिज अधिनियम अंतर्गत आरोपी नंबर एक संतोष गबाजी भूमकर वय वर्ष ३५ आरोपी नंबर दोन भरत संजय राठोड वय वर्ष २३ दोन्ही राहणार ताडशिवनी ता. सिंदखेड राजा व पिवळ्या रंगाचे केबिन व राखाडी रंगाचे डाले असलेला टिप्पर क्रमांक एम एच २८ बीबी ९० ४८ व त्यामध्ये अवैद्य वाळू यांची अंदाजे एकूण किंमत ८,०६,०००/ चा मुद्देमाल व आरोपी नंबर एक समाधान नारायण मोरे व गुन्हा क्र. २, सचिन नामदेव राठोड वय वर्ष २६ दोन्ही राहणार ताडशिवनी ता. सिंदखेड राजा यांचेकडून पिवळ्या रंगाचे केबिन असलेला व राखाडी रंगाचे डाले असलेला टिप्पर क्रमांक एम एच २८ बीबी ६१ १२ व लाल रंगाची मारुती स्विफ्ट डिझायर गाडी क्रमांक एम एच २८ बी क्यू ६७ ४९ असा अंदाजे एकूण किंमत १०,५६,०००/ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला व त्यानुसार गुन्हा दाखल करून माननीय ठाणेदार श्री संजय मातोंडकर किनगाव राजा यांनी पोहेका. अनिल नागरे यांच्याकडे पुढील तपास देण्यात आल्याचे सांगितले. सदर कारवाईत ठाणेदार संजय मातोंडकर किनगाव राजा पोलीस स्टेशन,gpsi शरद ठोंबरे, पोहेका अनिल नागरे, पोहेका विश्वास काकड, पोलीस चालक आतिश सावडे व तपासकामी इतर पोलीस कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. किनगाव राजा पोलीस ठाणे ठाणेदार श्री संजय मातोंडकर यांनी सांगितले की " कायद्याला डोळ्यात तेल घालून धुडकावणाऱ्या अवैध धंदे चालक व वाळू माफियांना अजिबात पाठीशी घालणार नाही, अअवैध धंदे करणाऱ्या विरुद्ध अशीच कठोर कारवाई सुरू राहील, कुठल्याही शासकीय व राजकीय हस्तक्षेपाला बळी न पडता अशीच कठोर कारवाई पोलीस स्टेशन किनगाव राजा तर्फे सुरू राहील " हे देखील सांगितले. त्यामुळे नागरिकांनी देखील अशा प्रकारची माहिती पोलिसांना न घाबरता देत राहावी असे आवाहन देखील केले. या कारवाईनंतर अवैध धंदे चालक व अवैध वाळू माफी यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे. स्थानिक व परिसरातील नागरिकांनी पोलीस स्टेशन किनगाव राजाचे ठाणेदार व पोलीस कर्मचारी यांच्या या कारवाईचे स्वागत केले व यापुढे देखील अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर कारवाई सुरू राहावी अशी आशा व्यक्त केली जात आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ सप्टेंबर २०२५


## जगातील सर्वांत महान शिक्षक : हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम)



**ज**गाच्या इतिहासात अनेक थोर पुरुष, विचारवंत, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, क्रांतिकारक आणि शिक्षक झाले. प्रत्येकाने आपल्या कर्तृत्वाने मानवजातीला काही ना काही दिले. परंतु जर "जगातील सर्वांत महान शिक्षक" या पदवीचा खरा हक्कदार कोण आहे, हा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर एकच- हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम). त्यांनी फक्त धार्मिक शिक्षणच दिले नाही तर मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मार्गदर्शन केले. त्यांच्या शिकवणीमुळे अंधारमय, अशिक्षित आणि अशांत समाजात प्रकाश, संस्कार आणि सभ्यता आली.पैगंबरांच्या काळातील समाजस्थितीहजरत मोहम्मद (स.अ.व.) यांचा जन्म इ.स. ५७१ मध्ये मक्केत झाला. त्या काळाला "जाहिलियत" म्हणजे अज्ञानाचा काळ असे म्हटले जात होते. समाजात अज्ञान, स्त्रियांवरील अन्याय, मद्यपान, खून, युद्ध, दारिद्र्य, गुलामगिरी, अन्याय आणि क्रूरता यांचा अतिरेक होता. समाजात नैतिक मूल्यांचा लवलेशही नव्हता. अशा काळात एक व्यक्ती (पैगंबर) उभे राहून संपूर्ण समाजाला सत्य, नैतिकता, बंधुता, समानता आणि अल्लाह ची इबादत ( ईश्वरभक्तीचा) संदेश देत आहे, हे मोठे आश्चर्यकारक होते.शिक्षक म्हणून हजरत मोहम्मद (स.अ.व.) ची भुमिकाहजरत मोहम्मद (स.अ.व.) यांनी स्वतःला कधीही राजा, सरदार किंवा शासक म्हणून घोषित केले नाही. ते म्हणाले "मी तर फक्त शिक्षक म्हणून पाठविण्यात आलो आहे."यातूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख पटते.ते फक्त धर्म शिकवत नव्हते, तर सर्व जाती धर्मातील लोकांना आदर्श जीवन जगण्याची कला शिकवत होते. लोकांना प्रामाणिकपणा, धैर्य, संयम, दया, करुणा, शिस्त, परस्पर आदर, व्यवहारातील प्रामाणिकपणा आणि समाजहिताचे महत्त्व शिकवत होते. हजरत मोहम्मद (स.अ.व.) यांनी शिकवणीसाठी विविध पद्धती वापरल्याहजरत मोहम्मद (स.अ.व.) यांनी आपल्या आचरणातून लोकांना शिकवण दिली. ते जे सांगत होते त्याचे आचरण स्वतःकरीत होते. उदाहरणार्थ, त्यांनी लोकांना साधेपणा शिकवला आणि स्वतः साधे जीवन जगले.संवादातून शिक्षण - प्रश्नोत्तराच्या माध्यमातून लोकांचे शंका दूर केल्या. समानतेचा माहिती देताना त्यांनी सांगितले की ,सर्व मानव अल्लाहच्या दृष्टीने समान आहेत. कुणीही जाती, वंश, रंग किंवा श्रीमंतीवर श्रेष्ठ नाही. हजरत मोहम्मद (स.अ.व.) यांनी कधीच कठोर शब्दांचा वापर केला नाही. चुकीचे काम करणाऱ्यांनाही संयमाने आणि प्रेमाने सुधारले.पैगंबरांच्या शिकवणीचे मुख्य मुद्देतौहीद (एकेश्वरवाद) - फक्त एकच अल्लाह( ईश्वर )आहे, त्याच्यासमोर सर्व समान आहेत. न्याय आणि प्रामाणिकपणा प्रत्येक व्यवहारात सत्य, प्रामाणिकपणा आणि न्याय असावा. बंधुता आणि समानता काळा-पांढरा, श्रीमंत-गरीब, उच - निच यांत भेद नाही. स्त्रियांचा सन्मान, स्त्रियांना वारसा हक्क, शिक्षण, आणि संरक्षण दिले. शिक्षणाचे महत्त्व पैगंबर म्हणाले, "ज्ञान मिळवणे प्रत्येक मुस्लिम पुरुष आणि स्त्रीवर बंधनकारक आहे."दया आणि करुणा माणसांवरच नाही तर प्राण्यांवर, निसर्गावरही दया दाखवा. पैगंबरांचे जीवनच आचारसंहिता हजरत मोहम्मद (स.अ.व.) चे प्रत्येक कृत्य शिकवण देते. उदाहरणार्थ :त्यांनी अनाथ मुलांचे संगोपन केले आणि समाजाला सांगितले की अनाथांची काळजी घेणे ही मोठी पुण्यकर्म आहे.त्यांनी शत्रूनाही क्षमा केली. मक्केच्या विजयाच्या वेळी शत्रूना शिक्षा न देता "आज तुमच्यासाठी शिक्षा नाही" असे सांगितले.त्यांनी गरीब, गुलाम,व महिलांशी समानतेने वागले.हजरत मोहम्मद (स.अ.व.) ची शिक्षक म्हणून यशस्वीताज्या समाजात मुलीचा जन्म पाप मानला जात होता, तोच समाज पैगंबरांच्या शिकवणुकीमुळे मुलींना आदराने वागवू लागला. जिथे खून, दरोडे आणि खोटेपणा सामान्य होते, तेथे प्रामाणिकपणा, न्याय आणि सेवा या मूल्यांचा प्रसार झाला. जिथे शिक्षणाचा अभाव होता, तेथे ज्ञानाची मशाल पेटली. अशा प्रकारे २३ वर्षांच्या काळात त्यांनी एक संपूर्ण संस्कारित, शिस्तबद्ध आणि प्रगत समाज उभा केला.आधुनिक काळातील हजरत मोहम्मद (स.अ.व.) ची शिकवणआज विज्ञान, तंत्रज्ञान, संपत्ती युगातही माणूस अस्वस्थ आहे. हिंसा, अन्याय, भ्रष्टाचार, कौटुंबिक विघटन, मानसिक ताण वाढत आहे. अशा वेळी पैगंबरांची शिकवण अधिकच उपयुक्त ठरते .प्रामाणिकपणा आणि नैतिकता समाजात भ्रष्टाचार कमी होईल.बंधुता आणि समानताजातीभेद, वर्णभेद नष्ट होतील.स्त्रियांचा सन्मान व महिलांवरील अत्याचार कमी होतील. समाजात शांतता , सहिष्णुता , सहकार्य आणि प्रेम वाढेल.हजरत मोहम्मद (स.अ.व.) हे खरेच जगातील सर्वांत महान शिक्षक आहेत. त्यांनी केवळ एका समाजाला नव्हे तर संपूर्ण मानवजातीला जगण्याची दिशा दिली. त्यांचे शिकवण आजही जिवंत आहे आणि पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे.त्यांचे जीवन हे जगाला दाखवून दिलेली जिवंत शाळा आहे. तेच खरेच सर्वांत महान शिक्षक होते, आहेत आणि राहतील.

खान अल्ताफ अस्मतुल्ला
सहशिक्षकअल्लामा शिबली उर्दू प्राथमिक शाळा नवाबपुरा औरंगाबाद

## विश्वकर्मा विद्यामंदिर शाळेत शिक्षक दिन साजरा

**छत्रपती संभाजीनगर** : दि. ५ सप्टेंबर रोजी विश्वकर्मा विद्यामंदिर शाळेत 'शिक्षक दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत शाळा चालवण्याचा अनुभव घेतला. आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनीशिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाला अध्यक्ष पंडित शिंदे तर प्रमुख पाहुणे प्रदिप भाले यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राज म्हात्रे तर आभारप्रदर्शन गोपाल उगले यांनी केले.या वेळी रमेश जोशी, नृसरत सय्यद,साक्षी रोजेकर यांची उपस्थिती होती.

## केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प येथे शिक्षक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन




**नाशिक** : देशभरात शिक्षक दिन हा महान शिक्षक आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. शहरातील तोफखाना केंद्र परिसरातील पीएमश्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प येथे झालेल्या प्रार्थना सभेत प्राचार्य गजराज मीना यांनी दीपप्रज्वलन केले आणि डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यាप्रसंगी विद्यार्थ्यांऐवजी सर्व शिक्षकांनी विशेष परिपाठ सादर केला. शिक्षकांनी प्रेरणादायक गीत गायले आणि एक संदेशपर लघुनाट्य सादर केले. सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सन्मान केला आणि त्यांच्या योगदानाचे कौतुक केले. अभ्यासक्रमेतर उपक्रमात विद्यार्थ्यांनी सुंदर शुभेच्छापत्रे बनवली. त्यांची प्रदर्शनी भरवण्यात आली. बारावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका बजावली आणि संपूर्ण दिवस वर्गात शिकवले. या अनुभवातून विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांची भूमिका आणि जबाबदाऱ्या जाणून घेण्याची संधी मिळाली. प्राचार्य गजराज मीना यांनी सर्व शिक्षकांच्या यशस्वी योगदानाचे कौतुक केले, त्यांना प्रेरणा दिली आणि विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी प्रोत्साहित केले. केंद्रीय विद्यालय संगठनच्या आयुक्त प्राची पाण्डेय यांनी पाठवलेला शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा संदेश त्यांनी शिक्षकांसोबत शेअर केला.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ सप्टेंबर २०२५


# अन् शाळेचा लळा लागला

**मी** अगदी तीन ते चार वर्षाचा होतो.त्यावेळी अंगणवाडी नसल्यामुळे सहा वर्षे पूर्ण झाली की शाळेत प्रवेश मिळायचा अन् पहिलीपासून शाळा सुरू व्हायची.त्यावेळी गुरुजींची खूप भीती वाटत होती.मी पाहायचो की बरेच पोरं एक दोन वर्षे शाळेची हौस झाली की ढोरं वळणे पसंत करायचे पण पुन्हा शाळेचे नाव घेत नव्हते. गुरूजींच्या जाळ्यात सापडणं म्हणजे आपला खेळ खल्लास इतकी दहशत शाळेतील पोरांमध्ये होती.म्हणून मला वाटायचं की उभ्या जन्मात शाळेत जाऊच नाही. मोठा भाऊ शाळेत तिसरीला होता. वर्गात एकदा त्याने नाकात पेंशील घातली अन् ती निघेना म्हणून स्वतः गुरुजीनी त्याला घरी आणून सोडले .वडिलांनी त्याला डॉक्टरकडे नेले व पेंशील नाकातून काढली या प्रसंगामुळे एक धडा मला ही मिळाला की गुरुजी घरापर्यंत येतात.मी शाळेत नसतानाही गुरुजीच्या भीतीने चुकूनही शाळेकडे जात नव्हतो.असेच एक दिवस गल्लीत वडिलांनी बातमी पसरवली की शाळेपुढे भला मोठा हत्ती आला आहे व सारं गावं त्याला पाहण्यासाठी जमा झालं म्हणून वडील म्हणाले की चाल तुला हत्ती दाखवतो व त्या काळी फक्त हत्तीचे चित्र गल्लीत एका घराच्या भीतीला पाहिलेले होते म्हणून हत्तीला पाहण्याची उत्सुकता मला ही लागली म्हणून शाळेकडे हत्ती पाहण्यासाठी जाण्यास राजी झालो. तेव्हा वडिलांनी मला उचलून खांद्यावर घेतले व डायरेक्ट शाळेतील पहिलीच्या वर्गात नेऊन बसवले. तेव्हा समजले की हत्ती तर दिसला नाही पण आपला पोपट होऊन गेला व गुमान छडीच्या धाकाने खाली फरशीवर बसलो. उभ्या जन्मात फरशी पाहिलेली नव्हती शेणाने सारवलेल्या घरात बसण्याची सवय झाली होती पण इथं गारगार फरशी असूनही गुरुजींच्या हातातील भली मोठी छडी पाहून दरदरून घाम फुटला.गुरुजींनी ताकीद दिली की उद्यापासून रोज शाळेत यायचे नाही आला तर मी तुझ्या घरी येऊन तुला मारत मारत शाळेत घेऊन येईल.त्या वेळी असे वाटले की आता काही मरेपर्यंत सुटका नाही. दुसऱ्या दिवसापासून मी नित्य नियमाने शाळेत जाऊ लागलो.वडिलांनी शनिवारी शेजारच्या गावी जाऊन बाजारातून पाटी पेंशील आणली व गोणपाटाची पिशवी घरी बनवून दिली की तिचा दप्तर म्हणून उपयोग झाला.शाळेतील गरीबांचे पोरं दप्तर म्हणून गोणपाटाचाच उपयोग करीत असत.हळू हळू शाळेचा लळा लागला होता.जे गुरुजी सुरुवातीला यमापेक्षा ही भयंकर भासत होते तेच गुरुजी रोज शाळेच्या कपाटातून इयत्ता पहिलीचे पुस्तकं काढायचे व आमच्या जवळ बसून आम्हाला शिकवायचे.त्यामुळे अक्षरांची ओळख झाली .अगदी पहिलीच्या वर्गात बाराखडी,उजळणी,जोडशब्द माहीत झाल्यामुळे एका नवीन जगात प्रवेश झाल्याचे समाधान मिळू लागले.जे गुरुजी सुरुवातीला लै डेंजर वाटायचे ते किती प्रेमळ होते हे त्यांच्या सहवासाने समजले. शेवटी उन्हाळ्याच्या सुरुवातीला पहिलीची परीक्षा पाटीवर दिली. जो विद्यार्थी उजळणी शंभरपर्यंत व बाराखडी सर्वांच्या आधी लिहिल त्याला वर्गात नंबर पहिला देऊन पास करील असे गुरुजींनी परीक्षेच्या आधी सांगितले होते म्हणून मी खूप लवकर उजळणी व बाराखडी लिहून गुरुजींना दाखवली. 1 मे ला परीक्षेचा निकाल लागला .मी पहिलीला पहिल्या नंबरने पास झालो.घरी पळत येऊन आईला ही गोड बातमी सांगितली.आईला ही खूप आनंद झाला व तिने चिमूटभर साखर देऊन तोंड गोड केले.अशा रीतीने खऱ्या अर्थाने शाळेचा लळा लागला तो कायमचा.


**ज्ञानेश्वर गायके**<br>
**कन्नड एम.ए. (मराठी, हिंदी, राज्यशास्त्र)**<br>
**बी.एड.(सेट-राज्यशास्त्र)**


# मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांचा शासन आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग



**छत्रपती संभाजीनगर** : मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शासन आयोजित कला उत्सव 2025-26 जिल्हास्तरीय स्पर्धेत उत्साहाने सहभाग नोंदविला. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य व वाद्यवृंद सादरीकरण करून शाळेचा गौरव वाढविला.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी तसेच सर्व शिक्षकांनी सहभागी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

# शिक्षक

वाडीवस्तीत जन्मलेला  
शिक्षणासाठी झटलेला  
ज्ञानशिदोरी घेऊन  
गावोगावी पोहोचलेला

जन्मदात्यांना जपणारा  
नात्यागोत्यात रमणारा  
समाजासोबत राहून  
पोरांसाठी झटणारा

संस्कृती सांभाळणारा  
नीतीमूल्य जगणारा  
इतिहास शिकवताना  
भविष्य घडवणारा

पिढ्यांसाठी झिजणारा  
झिजताना उजळणारा  
क्षणाक्षणाने संपताना  
किर्तिरूपे उरणारा

विद्येचा उपासक  
सदगुणांचा संग्राहक  
जो आहे एक शिक्षक  
होय, एक शिक्षक.


**संजय रावसाहेब जाधव**<br>
**शिऊर,**<br>
**ता. वैजापूर,**<br>
**जि. छ. संभाजीनगर.**<br>
**मो. ८२० ८९५ ८८ ०५**



**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**

**Diploma In Medical Laboratory Technology**

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ सप्टेंबर २०२५

# पुस्तक वाचन : ज्ञानाचा दीप आणि समाज परिवर्तनाचा मार्ग

मानवाच्या उत्क्रांतीचा इतिहास पाहिला तर त्यात ज्ञान आणि अनुभव साठवण्याच्या साधनांचा सतत शोध लागलेला दिसतो. आदिमानवाने गुंफांमध्ये भित्तीचित्रे काढून जीवनाचे संकेत दिले, मौखिक परंपरेतून कथा व गाणी पुढे गेली, पण लिखित शब्दाच्या शोधानंतर मानव सभ्यतेला खऱ्या अर्थाने दिशा मिळाली. पुस्तक हे केवळ माहिती जतन करण्याचे साधन नव्हे, तर विचारांचे भांडार, संस्कृतीचे आरसे आणि पिढ्यान्पिढ्यांना जोडणारे दुवा बनले आहे. त्यामुळेच 06 सप्टेंबरला साजरा होणारा राष्ट्रीय पुस्तक वाचन दिन आपल्याला या अद्वितीय परंपरेची पुन्हा जाणीव करून देतो. हा दिवस फक्त एक औपचारिक साजरा करण्याचा नसून, प्रत्येकाने वाचनसंस्कृती जोपासण्याचा आणि पुढच्या पिढीकडे पोहोचवण्याचा संकल्प करण्याचा आहे.

पुस्तक वाचन हे मुळात जीवन घडवण्याची प्रक्रिया आहे. एखाद्या व्यक्तीच्या विचारांवर, त्याच्या बोलण्यातल्या शालीनतेवर, निर्णयक्षमतेवर वाचनाचा खोलवर प्रभाव दिसतो. पुस्तक वाचताना आपण लेखकाच्या अनुभवात शिरतो, त्याच्या दृष्टीकोनातून जग पाहतो आणि स्वतःच्या विचारविश्वाचा विस्तार करतो. म्हणूनच पुस्तक हे कधी गुरू बनते, कधी मित्र तर कधी प्रेरणा देणारा मित्र होते. पुस्तक वाचनाच्या माध्यमातून आपल्याला जगण्याची नवी दृष्टी मिळते, समस्यांचा विचार करण्याची नवी पद्धत मिळते. हेच वाचनाचे सामर्थ्य आहे.

भारतीय परंपरेत वाचनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. बौद्ध, जैन, चार्वाक साहित्य, संतवाङ्मय, विविध समाजसुधारकांचे ग्रंथ या सगळ्यांनी भारतीय समाजाच्या मनावर खोल ठसा उमटवला आहे. संत ज्ञानेश्वरांच्या ओव्यांतून जीवन तत्त्वज्ञान शिकायला मिळाले, संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून भक्ती-निष्ठा रुजली, तर महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखाणातून सामाजिक विषमतेविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असंख्य ग्रंथांचा अभ्यास करून समाज परिवर्तन घडवून आणले. म्हणून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जगामध्ये 'ज्ञानाचे प्रतिक म्हणून ओळखले जाते. महात्मा गांधींनी वाचनातून अहिंसा व सत्याग्रहाची नीती आत्मसात केली. पंडित नेहरूंनी तुरुंगात वाचन करून इतिहास व राजकारणाचा अभ्यास केला. या सगळ्यांमधून एक गोष्ट स्पष्ट होते की, वाचनाशिवाय वैचारिक क्रांती घडत नाही.

आजच्या काळात मात्र वाचन संस्कृतीला गंभीर आव्हाने आहेत. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, डिजिटल मनोरंजन यांनी लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. काही मिनिटांत हजारो पोस्ट्स डोळ्यांसमोरून जातात, पण त्यातून मनावर ठसा उमटवणारी गोष्ट क्वचितच सापडते. अशा वेळी पुस्तक वाचनाची गोडी कमी होणे हे चिंताजनक आहे. कारण वाचनाने केवळ माहिती मिळत नाही, तर चिकित्सक दृष्टी विकसित होते. समाजात खरेखुरे सुशिक्षण हवे असेल, तर पुस्तक वाचनाचा संस्कार आवश्यक आहे.

बालकांना लहानपणी पुस्तक वाचनाची आवड लावणे ही सर्वात मोठी गुंतवणूक आहे. गोष्टींची पुस्तके मुलांच्या हातात द्या, त्यांना मोठ्याने वाचून दाखवा, शाळांमध्ये वाचनालयाचा नियमित वापर होऊ द्या, या छोट्या कृतीतून पुढची पिढी बौद्धिकदृष्ट्या बलवान होईल. पुस्तक वाचनातूनच भाषेचे ज्ञान वाढते, कल्पनाशक्तीला पंख फुटतात, प्रश्न विचारण्याची हिंमत मिळते. हे गुण पुढे समाज बदलवण्याची ताकद निर्माण करतात.

पुस्तक वाचनाचे मानसिक फायदेही तितकेच मोठे आहेत. वाचन केल्याने तणाव कमी होतो, मन शांत होते, स्मरणशक्ती वाढते, विचार करण्याची क्षमता तीक्ष्ण होते. एखाद्या कादंबरीतील पात्र आपल्याला आपले वाटते, कवितेतील शब्द मनाला स्पर्श करतात, तर इतिहासग्रंथ वाचताना आपली मुळे कळतात. या सगळ्या अनुभूती पुस्तक वाचनातूनच मिळतात. म्हणूनच पुस्तक वाचन हे केवळ छंद नसून मानसिक आरोग्य सुधारण्याचा एक सुंदर मार्ग आहे.

तंत्रज्ञानाच्या युगात पुस्तक वाचनाचे स्वरूप बदलले आहे. आज ई-बुक्स, ऑडिओ बुक्स, डिजिटल लायब्ररी सहज उपलब्ध आहेत. मोबाईलवरूनही पुस्तक वाचन करणे शक्य आहे. त्यामुळे पुस्तक वाचन संस्कृती जपताना आपण या नवीन साधनांचा स्वीकार केला पाहिजे. मात्र माध्यम काहीही असो, उद्देश एकच हवा ते म्हणजे ज्ञान, चिंतन आणि आत्मविकास होय.

पुस्तक वाचन हे फक्त वैयक्तिक आनंदापुरते मर्यादित राहू नये. त्याचा उपयोग समाज बदलण्यासाठी झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते, 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या त्रिसूत्रीतील पहिले पाऊल म्हणजे पुस्तक वाचन होय. पुस्तक वाचनाने व्यक्ती विचारशील बनते, आणि विचारशील व्यक्ती समाजात परिवर्तन घडवते. म्हणूनच पुस्तक वाचन ही खरी क्रांती आहे.

राष्ट्रीय पुस्तक वाचन दिन हा या सर्व मूल्यांची आठवण करून देतो. या दिवशी प्रत्येकाने एक संकल्प करावा तो म्हणजे दररोज किमान काही मिनिटे तरी पुस्तक वाचण्याचा. शाळा-महाविद्यालयांत वाचनस्पर्धा, वाचन मेळावे, लेखक-वाचक संवाद असे उपक्रम व्हावेत. घराघरांत छोट्या वाचनालयांची उभारणी व्हावी. पुस्तक हे भेटवस्तू म्हणून द्यावे. या सगळ्या कृतींनी समाजात वाचनसंस्कृती पुन्हा बहरू शकेल.

आज आपण अनेक सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक समस्यांना सामोरे जात आहोत. या समस्यांचे निराकरण केवळ तांत्रिक साधनांनी होणार नाही. त्यासाठी विचारशील, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडले पाहिजेत. ते नागरिक पुस्तकांच्या पानांतून तयार होतात. पुस्तक वाचनाने मनुष्य केवळ स्वतःला नव्हे, तर समाजालाही घडवतो. म्हणूनच राष्ट्रीय पुस्तक वाचन दिन हा फक्त स्मरणाचा दिवस नाही, तर भविष्यासाठीची दिशा आहे.

या राष्ट्रीय पुस्तक वाचन दिवसाचे खरे महत्त्व ओळखून आपण म्हणू या की, 'पुस्तक वाचणे म्हणजे केवळ अक्षर उलगडणे नव्हे, तर जीवनाचे नवे क्षितिज गाठणे आहे. पुस्तक वाचणारा समाज हा समृद्ध, संवेदनशील आणि प्रगत समाज असतो. म्हणूनच पुस्तक हातात घ्या, विचारांना उजाळा द्या आणि समाजाला नव्या दिशेने नेण्याचा संकल्प करा.'



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. 9960103582,**
**ईमेल - bagate.rajendra४@gmail.com**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ सप्टेंबर २०२५

# नवीन शिक्षण धोरण : दलित-आदिवासींना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे षडयंत्र - डॉ. समरेंद्र कुमार



आपल्या देशात धोरण निर्मितीची एक शोकांतिका आहे की, ज्यांच्यावर या धोरणांचा परिणाम होतो, त्या समूहाची या धोरणनिर्मितीत कोणतीही भूमिका नसते, त्यांच्याशी फारसा विचारविनिमय केला जात नाही. कोणत्याही क्षेत्रात हेच घडते, मग शिक्षणव्यवस्था त्याला अपवाद कशी असेल? केंद्र सरकारने नवीन शिक्षण धोरण आणले आहे आणि त्यांचा दावा आहे की यासाठी दोन लाखांपेक्षा जास्त लोकांकडून अभिप्राय (फीडबॅक) घेण्यात आला आहे. पण हे दोन लाखाहून अधिक लोक कोण होते? या शिक्षण धोरणाला आकार देणाऱ्या समूहाने देशातील प्रमुख विद्यापीठांमधील शिक्षक संघटना किंवा त्यांच्या संवैधानिक संस्था (उदा. शैक्षणिक परिषद, कार्यकारी परिषद, इत्यादी) यांच्या निर्वाचित प्रतिनिधींशी काही चर्चा केली का? उत्तर 'नाही' असे आहे, कारण चर्चेसाठी एका विशिष्ट संस्थेच्या लोकांनाच बोलावण्यात आले होते. सत्ताधारी पक्षाशी संबंधित शिक्षक आणि विद्यार्थी संघटनेचे लोकच फक्त 'भागधारक' (स्टेक होल्डर) आहेत का? इतर संघटनांनी न मागताही आपले विचार आणि सूचना पाठवल्या, पण या समूहाने त्यांची दखल घेतली असेल का, याबाबत शंकाच आहे.केंद्र सरकार शिक्षणव्यवस्थेत मोठे बदल करण्याच्या नावाखाली या आपत्काळात घाईघाईने निर्णय घेऊन ते देशावर लादत आहे, यातून नेमका कोणता मूलभूत बदल होईल, हे समजण्यापलीकडचे आहे. या शिक्षण धोरणातील उच्च शिक्षणाशी संबंधित मुद्द्यांवर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. हे धोरण स्पष्टपणे खाजगीकरण प्रभावीपणे लागू करण्याचा एक दस्तऐवज (डॉक्युमेंट) असल्यासारखे दिसते. उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाची प्रक्रिया आधीपासूनच सुरू आहे, पण आता सरकारने हे क्षेत्र पूर्णपणे मार्केटच्या हाती सोपवण्याचा निर्णय जाहीर केला आहे.नवीन शिक्षण धोरण आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या खाजगी विद्यापीठांच्या समूहांमध्ये मोठ्या कॉर्पोरेट खेळाडूंना प्रवेश करण्याचा मार्ग मोकळा करेल. तसे संकेत तेव्हाच मिळाले होते, जेव्हा सरकारने 'इन्स्टिट्यूट ऑफ एमिनन्स' (Institute of Eminence) ची घोषणा केली होती. त्यावेळी ज्या 'जिओ विद्यापीठा' (Jio University) चा समावेश करण्यात आला होता आणि ज्याची रूपरेषा अजूनही कागदावरच होती, त्याला आता प्रत्यक्षात आणणे सोपे होईल. सरकारी शिक्षण संस्था आता विकत घेता आणि विकता येतील, तसेच त्या बंद करणेही सोयीचे होईल. पुढे, आर्थिक संकटात सापडलेल्या कोणत्याही सरकारी महाविद्यालयाचे अधिग्रहण करून त्याचे 'खाजगी विद्यापीठा'त रूपांतर करणे सोपे होईल.नवीन शिक्षण धोरणात असे म्हटले आहे की, प्रत्येक संस्था आर्थिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय दृष्ट्या स्वायत्त (स्वतंत्र) असतील. या नवीन शिक्षण धोरणांतर्गत, पुढील १५ वर्षांत, म्हणजे २०२५ पर्यंत, विद्यापीठांशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची संलग्नता (affiliation) संपुष्टात आणण्याची तरतूद आहे आणि त्यांना स्वायत्त बनवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. केंद्र सरकार आधीपासूनच महाविद्यालयांना स्वायत्त बनवण्याची योजना राबवत होते; परंतु आतापर्यंत, विशेषतः दिल्ली विद्यापीठात, शिक्षक संघटनांच्या विरोधामुळे आणि महाविद्यालये विद्यापीठांशी संलग्न असल्यामुळे ही योजना यशस्वी होऊ शकली नव्हती. पण नवीन शिक्षण धोरणांतर्गत हे सर्व सोपे होईल. अशा महाविद्यालयांना स्वायत्त पदवी (Autonomous Degree) देणारी महाविद्यालये म्हणून मान्यता मिळेल. पण या तथाकथित स्वायत्ततेची किंमत विद्यार्थ्यांकडून वसूल केली जाईल. हे नियम स्पष्टपणे उच्च शिक्षण क्षेत्रात सरकारी निधी वाटपात मोठी आर्थिक कपात होणार असल्याचे दर्शवतात. असे करून सरकार आपली आर्थिक जबाबदारी झटकण्याचा इरादा स्पष्ट करत आहे.स्वायत्त झाल्यावर सर्व शिक्षण संस्था आणि महाविद्यालयांना त्यांच्या आर्थिक व्यवस्थापनासाठी 'आत्मनिर्भर' व्हावे लागेल आणि आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी एकतर 'हायर एज्युकेशन फायनान्सिंग एजन्सी (HEFA)' कडून कर्ज घ्यावे लागेल किंवा इतर मार्गांनी आर्थिक संसाधनं गोळा करावी लागतील. दोन्ही परिस्थितीत, आर्थिक भार विद्यार्थ्यांवर पडेल. त्यामुळे फी मध्ये निश्चितच मोठी वाढ होईल, ज्याचा भार उचलणे आर्थिकदृष्ट्या कमकुवत कोणत्याही समाजातील कुटुंबासाठी कठीण होईल. पण याचा सर्वाधिक तोटा दलित, आदिवासी आणि मागासवर्गीय लोकांना होईल. आर्थिकदृष्ट्या कमकुवत सवर्ण वर्ग आणि इतर धार्मिक समुदायही याने प्रभावित होतील.ज्या उच्च शिक्षणामुळे समाजाच्या विचारसरणीत आणि रचनेत बदल शक्य झाला आहे, हे नवीन शिक्षण धोरण याच वर्गाला त्यापासून वंचित करेल. काही समर्थक असा युक्तिवाद करू शकतात की यात 'शिष्यवृत्ती' (स्कॉलरशिप) ची तरतूद करण्यात आली आहे. पण ती सर्व गरजू विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होईल का? आजही 'शिष्यवृत्ती' अस्तित्वात आहे, पण ती पुरेशी नाही. सध्या तुलनेने कमी फी असल्यामुळे हा वर्ग कसातरी उच्च शिक्षणाकडे पाहण्याचे धैर्य मिळवतो आणि अनेक जण संघर्ष करत पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करतात. पण, येणाऱ्या काळात कदाचित हा वंचित वर्ग उच्च शिक्षणाचे स्वप्न पाहणेही सोडून देईल!नवीन शिक्षण धोरणात सरकारचा दावा आहे की ते शिक्षण संस्थांना शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वायत्तता देतील. ही स्वायत्तता विद्यापीठांमध्ये आधीपासूनच अस्तित्वात होती, त्यामुळे ही काही नवीन गोष्ट नाही. आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे विद्यापीठांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वायत्ततेत सर्वाधिक हस्तक्षेप सध्याच्या सरकारनेच केला आहे. अभ्यासक्रम तयार करण्याचा असो किंवा संशोधनासाठी विषय निश्चित करण्याचा मुद्दा असो; विद्यापीठांमध्ये यासंबंधी निर्णय घेण्यासाठी अधिकृत असलेल्या संस्था- रिसर्च कौन्सिल, अॅकॅडमिक कौन्सिल, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल इत्यादींना बाजूला सारून सरकारच्या आदेशानुसार निर्णय घेतले गेले. २०१५ च्या सत्रापासून लागू केलेल्या 'चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टम (CBCS)' साठी अभ्यासक्रम (syllabus) तयार करण्याचे काम UGC ने केले होते, तर त्यांची भूमिका फक्त अनुदान देण्यापुरती मर्यादित होती. वास्तविक अभ्यासक्रम तयार करण्याचे काम विद्यापीठाच्या संबंधित विभाग, संकाय आणि अॅकॅडमिक कौन्सिल करायचे. हे स्पष्टपणे विद्यापीठांच्या शैक्षणिक स्वायत्ततेवर हल्ला होता.या शिक्षण धोरणात शिक्षकांची नेमणूक एका निश्चित कालावधीसाठी (term) करण्याची गोष्ट केली आहे, हे निश्चितच शिक्षकांमध्ये भविष्याबद्दल अनिश्चिततेची भावना निर्माण करेल. आज देशभरात मोठ्या संख्येने पात्र उमेदवार तात्पुरत्या (ad-hoc) किंवा करारावर (contract) काम करत आहेत, पण रिक्त पदे कायमस्वरूपी भरण्यासाठी आवश्यक ठोस पाऊले उचलली गेली नाहीत. आज जे लोक तात्पुरत्या स्वरूपात काम करत आहेत, ते भविष्याच्या दबावाखाली आणि तणावात आहेत. दिल्ली विद्यापीठासारख्या प्रतिष्ठित आणि अग्रगण्य विद्यापीठात ५० टक्क्यांहून अधिक प्राध्यापक तात्पुरते आणि अतिथी (गेस्ट) म्हणून काम करत आहेत, तर राज्यांच्या विद्यापीठांची स्थिती तर याहूनही वाईट आहे. परिणामी, प्रतिभावान लोक उच्च शिक्षण क्षेत्रात पुढे येत नाहीत. अशा परिस्थितीत, अभ्यास-अध्यापन आणि संशोधनावर परिणाम होणे स्वाभाविकच आहे. विद्यापीठांमध्ये शैक्षणिक स्तराची घसरण आणि गुणवत्तापूर्ण संशोधनाचा अभाव हे एक महत्त्वाचे कारण आहे. शिक्षकांना कायमस्वरूपी करण्यासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले जात नसेल, तर उच्च शिक्षणाचे चित्र कसे बदलेल? दिल्ली विद्यापीठासारख्या देशातील सर्वात प्रतिष्ठित विद्यापीठात काही शिक्षक दोन दशकांपेक्षा जास्त काळ तात्पुरते म्हणून शिकवत आहेत, तर हजारो शिक्षक अनेक वर्षांपासून मुलाखतीची वाट पाहत आहेत. एकाच महाविद्यालयात त्याच पदासाठी तीन-चार वेळा अर्ज भरले गेले आहेत पण मुलाखती झाल्या नाहीत. नवीन शिक्षण धोरण या समस्येचे निराकरण करण्याऐवजी ती वाढवत आहे.नवीन शिक्षण धोरणांतर्गत चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाला सरकारची दूरदृष्टी म्हणून अनेक लोक मांडतील. पण ही देखील काही नवीन योजना नाही. २०१३ मध्ये तत्कालीन कुलगुरू प्रा. दिनेश सिंह यांनी दिल्ली विद्यापीठात हे लागू केले होते आणि अगदी याच रचनेसह त्यातही बाहेर पडल्यास वेगवेगळी पदवी देण्याची तरतूद होती. सत्तेत आल्यावर भाजप सरकारने तो अभ्यासक्रम रद्द केला. आज तोच अभ्यासक्रम त्याच रचनेत आणून सरकार आपली चूक सुधारू इच्छिते की ती पुन्हा करत आहे? जर २०१४ मध्ये तो अभ्यासक्रम चुकीचा होता आणि तो रद्द करण्यात आला, तर आता तोच अभ्यासक्रम योग्य कसा असू शकतो? जर २०१४ चा तो पदवी अभ्यासक्रम योग्य होता, तर तो रद्द करून सरकारने चूक केली नाही का? आणि या पावलामुळे आपली शिक्षणव्यवस्था या वर्षांमध्ये शैक्षणिकदृष्ट्या मागे तर गेली नाही ना? याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे.भारतासारख्या बहुविधता आणि भिन्नता असलेल्या विशाल देशासाठी, जिथे मोठ्या प्रमाणात गरिबी आहे, आर्थिक असमानता आहे, अनेक प्रकारचे धार्मिक-जातीय भेदभाव आणि असंतुलन आहेत आणि खूप मोठी लोकसंख्या अजूनही उच्च शिक्षणाच्या बाहेर आहे, तिथे उच्च शिक्षणाला स्वायत्ततेच्या नावाखाली बाजाराच्या हाती सोपवणे, वंचित वर्गाला या शिक्षणापासून दूर ठेवण्याचे षड्यंत्रच म्हटले जाऊ शकते. ज्या प्रकारे रेल्वे, LIC, भारत पेट्रोलियम आणि इतर सार्वजनिक उपक्रमांमध्ये परदेशी आणि खाजगी गुंतवणुकीला परवानगी देऊन आणि त्याची मर्यादा वाढवून सध्याच्या सरकारने उदारीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रक्रियेला प्रोत्साहन दिले आहे, त्याच प्रकारे उच्च शिक्षण क्षेत्रातही पुढे जात आहे.अपुऱ्या पायाभूत सुविधा, सरकारी अनुदानात कपात, वाढता राजकीय हस्तक्षेप, शिक्षण संस्थांची संपुष्टात येणारी स्वायत्तता, अनेक वर्षांपासून रिक्त असलेली पदे, शिक्षकांची मोठी कमतरता, मोठ्या संख्येने तात्पुरते किंवा करारावर काम करणारे शिक्षक इत्यादी समस्या मिळून भारतातील विद्यापीठांचा पाया पोकळ करत आहेत.राज्यांच्या विद्यापीठांची स्थिती तर आधीपासूनच वाईट होती, केंद्रीय विद्यापीठेही त्याच मार्गावर आहेत. उच्च शिक्षणामध्ये मूलभूत बदलांसाठी ज्या समग्र विचारसरणीची आणि दृष्टिकोनाची स्पष्टता आवश्यक आहे, त्याचा या नवीन शिक्षण धोरणात अभाव आहे. या नवीन शिक्षण धोरणामुळे खाजगीकरणाला बळ मिळेल, तर वंचित वर्गासाठी उच्च शिक्षण मिळवणे कठीण होईल.

**लेखक - डॉ. समरेंद्र कुमार,
माजी सदस्य, अॅकॅडमिक कौन्सिल,
दिल्ली विद्यापीठ. मराठी अनुवाद :
प्रा. प्रियदर्शन भवरेसौजन्य: मिडिया व्हिजील**